**अनुसूचित जाती/जमाती व इतर सामाजिक प्रवर्गातील इ.11 वी व 12 वी च्या विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांकरीता (मुले-मुलीकरिता) JEE+NEET या व्यावसायिक प्रवेश परिक्षांकरिता Super-50 या नाविण्यपुर्ण उपक्रमासाठी सन 2025 -26 व 2026-2027 या दोन वर्षांसाठी 100 विद्यार्थ्यांना निवास, भोजन व्यवस्थेसह प्रशिक्षण देणेबाबत.**

## जाहिर ई-निविदा (गुणांकन पध्दतीनुसार)

## अटी व शर्ती

1) ई-निविदा प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर राबविण्यांत येत आहे.

2) ई-निविदे संदर्भातील सुचना / शुध्दीपत्रके इ. ऑनलाईन पध्दतीने शासनाच्या वरील अधिकृत बेबसाईटवर राबविण्यांत येईल.

3) इच्छुक निविदाधारकांनी सदर ई-निविदेमध्ये सहभागी होण्यासाठी वरील वेबसाईटवर दिलेल्या सुचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

4) सदर जाहिर ई-निविदा दिनांक 08/ 07 /2025 रोजी वेळ सकाळी 11.00 वाजे पासून दिनांक 18 /07 /2025 रोजी सांयकाळी 5.00 वाजेपर्यन्त ऑनलाईन रित्या डाऊनलोड व सबमिशन करता येईल.

5) सदर निविदेमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक निविदाधारकांना **निविदा फार्म फी रुपये 15000/- व 3% निविदा बयाना रक्कम रुपये 5,72,775/- (अक्षरी रुपये पाच लक्ष बाहत्तर हजार सातशे पंच्याहतर मात्र)** ई- टेंडरिंग पोर्टलव्दारे Online भरणा करणे आवश्यक आहे.

6) ज्या निविदाधारकांचे वर नमुद नमुना तांत्रिक तपासणीमध्ये पात्र असतील अशाच निविदाधारकांचे व्यापारी लिफाफे घडण्यांत येईल.

7) निविदाधारकांनी वरील प्रमाणे बाबी विहीत वेळेमध्ये सादर न केल्यास त्यांची निविदा अवैध ठरविण्यांत येईल.

8) निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडण्याचा संभाव्य दिनांक 21 /07 /2025 रोजी सकाळी 11.00 वाजता उघडण्यांत येईल.

9) ज्या निविदाधारकाची निविदा मंजुर होईल अशा निविदाधारकास या कार्यालयाकडून प्रशासकिय मान्यता व तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतरच कार्यारंभ आदेश देण्यांत येईल. कार्यारंभ आदेश घेतेवेळी निविदाधारकाने निविदेतील अटी व शर्ती मंजुर असलेबाबत नियमानुसार आवश्यक बाँडपेपरवर करारनामा करणे अनिवार्य राहील.

10) उपलब्ध तरतुदीचे अधिन राहूनच आदेश देण्यांत येतील. निविदा सुचनेतील नमुद परिमाण संख्येत वाढ/घट होण्यांची शक्यता आहे.सदर प्रक्रिया वरीष्ठ कार्यालयांच्या आवश्यक कागदपत्रांच्या/आदेशाच्या/परवानगीच्या अधीन राहून राबविणेत येत आहे.

11) मुदतीत प्रशिक्षण पूर्ण न केल्यास विहीत नियमानूसार प्रती आठवडा 0.5% प्रमाणे दंडाची रक्कम देयकातुन वसूल करण्यांत येईल.

12) राज्य शासन व केंद्र शासनाची किंवा जिल्हा परिषदेशी संबधीत असणाऱ्या व्यक्तीस निविदा भरता येणार नाही.

13) कोणतीही सशर्त निविदा स्विकारली जाणार नाही/ विचारात घेतली जाणार नाही.

Scanned with CamScanner

14) निविदाधारकाच्या प्राधिकृत प्रतिनिधीने निविदेच्या सर्व कागदपत्रांवर स्वाक्षरी करुन सर्व कागदपत्रे स्वाक्षांकित करुन ऑनलाईन रित्या अपलोड करणे आवश्यक आहे.

15) निविदेतील मंजुर दर एक वर्षापर्यन्त ग्राह्य राहतील. त्यानुसार यापुढे उपलब्ध होणाऱ्या **प्रशिक्षण आदेश देण्यांत येतील**. त्या दराने प्रती विद्यार्थी प्रशिक्षण (कोचिंग), प्रती विद्यार्थी पुस्तके व स्टडी मटेरियल, शैक्षणिक खर्च व सुविधा ,निवास व्यवस्था व भोजन व्यवस्था, वाहतुक सुविधा व तद्अनुषंगिक बाबी इत्यादी बाबींची व्यवस्था करणे बंधनकारक असून मंजुर दरास कोणतीही भाववाढ देण्यांत येणार नाही.वरील प्रशिक्षण आदेशाप्रमाणे विद्यार्थ्यांना कोचिंग देणारे (JEE व NEET)साठीचा तज्ञ अध्यापक वर्ग स्थायी स्वरूपात नेमणे आवश्यक राहिल.

16) निविदेबाबत कोणतीही शंका/प्रश्न असल्यास निविदा भरण्यांच्या तारखेच्या किमान 3 दिवस आगोदर लेखी स्वरुपात विचारल्यास शंका निरसन करण्यांत येईल.

17) निविदाधारकांच्या/उत्पादकांच्या उत्पादन केंद्रांचे त्रयस्त यंत्रणे मार्फत आवश्यकता असल्यास भेट देऊन सदर साहित्य सुव्यवस्थित व सुस्थितीत असलेबाबतची पाहणी करण्यांत येईल. सदर पाहणीसाठी लागणारा खर्च निविदाधारकास करणे बंधनकारक राहील. त्याबाबत निविदाधारकास वेगळयाने कळविण्यांत येईल.

18) इच्छुक निविदाधारकांनी खालील प्रमाणे कागदपत्रे/ बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे. सदर कागदपत्रक पी.डी.एफ. फॉरमॅटमध्ये स्कॅन करुन बेबसाईटवर ऑनलाईनरित्या जिल्हा परिषदेस सादर करणे बंधनकारक आहे. सदर तांत्रिक लिफाफ्यात कागदपत्रांची अर्हता पूर्ण करीत असलेले पात्र असणाऱ्या निविदाधारकांचे वित्तीय लिफाफे उघडण्यांत येतील.

19 ) Only those bidders who qualify the technical evaluation will be eligible for opening of the financial bid. The bidder will be be considered based on combined score of weightages of the technical to financial bid ratio of 70:30 (70 percent weightage of technical bid and 30 percent weightage of financial bid)

20) निविदा कोणतीही पुर्व सुचना न देता रद्द करण्यांचे अथवा अटी शिथिल करण्यांचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी राखून ठेवलेले आहेत.

Scanned with CamScanner

## तांत्रिक लिफाफा (Technical Envelope)

| अ.क्र. | प्रशासकीय बाबी<br>तांत्रिक लिफाफ्यासोबत सादर करावयाची कागदपत्रे - | गुण |
|---|---|---|
| १ | १) शैक्षणिक संस्था/शासकीय/खाजगी प्रशिक्षण संस्था नाशिक जिल्हा परिषद मुख्यालयापासून अंदाजे ३५ किलोमीटर परिक्षेत्रात असणे आवश्यक राहील.<br>२) संस्थेसंबंधीत कोणतेही वाद तसेच न्यायालयीन प्रकरण न्यायप्रविष्ट नसलेबाबतचे व Non Blacklisted संस्थेचे हमीपत्र. (जोडपत्र -१)<br>३) संबंधित संस्थेतील कार्यकारी संचालक मंडळाच्या सभेतील सदर सुपर-५० या नाविण्यपुर्ण उपक्रम राबविणेस सहमती ठराव (जोडपत्र -२)<br>४) अध्यापनामध्ये संगणके, ओव्हरहेड प्रोजेक्टर, एल.सी.डी. इत्यादी तांत्रिक बाबी उपलब्धते बाबतची संख्या व फोटो तसेच क्रिएटीव्ह लर्निंग साहित्य उपलब्धेबाबतचे फोटो. (जोडपत्र -३)<br>५) सन २०२५-२६ व २०२६-२७ या शैक्षणिक वर्षामध्ये १०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठीची क्षमता उपलब्ध असलेबाबतचा तपशिल (निवास, भोजन व्यवस्था, वर्गखोली इत्यादी)<br>६) सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले लेखे (Balance Sheet) अहवाल तसेच अपवादात्मक स्थितीत जि.प.विभागामार्फत निधी निर्गमित होईपर्यंत संस्था सदर योजना राबविण्यास आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याचे संस्थेचे हमिपत्र (जोडपत्र -४)<br>७) संस्था परिसरात मुला-मुलींसाठीचे स्वतंत्र वसतीगृह असणे आवश्यक असून, सदरचे वसतीगृह विद्यार्थ्यांच्या राहणेसाठी सुरक्षित असल्याबाबत जिल्हयातील ग्रामीण क्षेत्रातील शैक्षणिक संस्थेसाठी कार्यकारी अभियंता (इवद), जिल्हा परिषद, नाशिक व शहरी क्षेत्रातील शैक्षणिक संस्थेसाठी कार्यकारी अभियंता (सा.बां.) , नाशिक यांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. (जोडपत्र-५) तसेच भोजन गुणवत्ता दर्जेदार असलेबाबत सहाय्यक आयुक्त (अन्न व औषधे) विभाग, नाशिक यांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. (जोडपत्र -६)<br>८) कार्यरत असलेला पुरेसा शिक्षक (अध्यापक वर्ग), शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यादी.(सोबत (JEE व NEET) साठी स्थायी अध्यापक वर्ग नेमणेबाबतचे हमीपत्र (जोडपत्र -७)<br>९) संस्थेला कंपाऊंड, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रॅम्प असलेबाबतचे फोटो. (जोडपत्र -८)<br>१०) मुलांच्या सुरक्षेसाठी योग्य ती व्यवस्था (सुरक्षारक्षक, अग्निशमन, सी.सी.टी.व्ही. आरोग्य इ.) (सुरक्षा रक्षकांची नावाची यादी, मोबाईल क्रमांकासह, अग्निशमन सुविधेचे फोटो) (जोडपत्र -९)<br>११) मुलांच्या आरोग्याचे दृष्टीने प्रथोपचार साहित्य आवश्यक असून, शैक्षणिक संस्था / शासकीय /खाजगी प्रशिक्षण संस्थेच्या दर्शनीय भागात डॉक्टर्स यांचे मोबाईल क्रमांक असणे आवश्यक आहे.(जोडपत्र -१०)<br>१२) संस्थेने GST Registration प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील, मागील तीन वर्षे ( सन २०२२-२३, सन २०२३-२४ सन २०२४-२५) GST व आयकर रिटर्न भरणा केलेले दस्तऐवज / कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील. (जोडपत्र -११)<br>१३) संस्थेने ई-निविदेतील सर्व अटी-शर्ती मान्य असलेबाबतचे हमिपत्र सादर करणे आवश्यक राहील. (जोडपत्र -१२)<br>१४) शैक्षणिक संस्था / शासकीय / खाजगी प्रशिक्षण संस्थेचे Joint Venture/ भागीदारी संस्था असल्यांस ते नोंदणीकृत असावे.त्याबाबतचे MOU (सामंजस्य करार ) करारनामा जोडावा.<br>१५) ई-निविदेतील सर्व अटीवरील बाबींचे पुरावे जोडणे बंधनकारक व आवश्यक आहेत. | ५ |
| २ | **विज्ञान प्रयोगशाळेसाठी खालील बाबी आवश्यक असून, पुरावा जोडावा. (खाजगी प्रशिक्षण संस्थेसाठी सदर गुण क्रमांक ८ मध्ये (१५+५= २० याप्रमाणे ) समाविष्ट होतील.)**<br>अ) प्रयोग शाळेकरीता १८ x २२ चे स्वतंत्र दालन असणे आवश्यक. (त्याबाबतचा पुरावा जोडावा)<br>ब) भौतिक शास्त्रासाठी आवश्यक ते साधन सामुग्री असणे आवश्यक. (त्याबाबतचा पुरावा जोडावा)<br>क) जीवशास्त्रासाठी आवश्यक ते साधन सामुग्री असणे आवश्यक. (त्याबाबतचा पुरावा जोडावा)<br>ड) रसायनशास्त्रासाठी आवश्यक ते साधन सामुग्री असणे आवश्यक. (त्याबाबतचा पुरावा जोडावा.) | ५ |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| ३ | **ग्रंथालय** खालील बाबी आवश्यक असून, पुरावा जोडावा.<br><br>**अ)** ग्रंथालयामध्ये प्रत्येक विषयाची पुस्तके/संदर्भ ग्रंथ मराठी विश्वकोष, वृत्तपत्रे, मासिक, नियतकालिके असणे आवश्यक.<br>**ब)** पुस्तकांकरिता कपाटे/वाचकांकरिता बसण्याची व्यवस्था असणे आवश्यक.<br>**क)** ग्रंथालय सुविधेचा सर्व विद्यार्थी/शिक्षकांसाठी शाळेच्या वेळेत व नंतरही अधिकाधिक वापर. | ५ |
| ४ | संस्थेमध्ये आवश्यक विद्युत रोषणाई (आवश्यक लाईटस्) तसेच विद्युत प्रवाह खंडीत झाल्यास जनरेटर असणे आवश्यक आहे (पुरावा जोडावा) | ५ |
| ५ | **वसतीगृह/प्रसाधनगृहे** खालील बाबी आवश्यक असून, पुरावा जोडावा.<br>**अ)** शैक्षणिक संस्था/शासकीय/खाजगी प्रशिक्षण संस्था व वसतीगृह एकाच आवारात असणे आवश्यक आहे.<br>**ब)** मुलांसाठी स्वतंत्र वसतीगृह/प्रसाधन गृह (विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात असावी)<br>**क)** मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृह /प्रसाधनगृहे (विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात असावीत)<br>**ड)** प्रसाधनगृहासाठी मुबलक पाणी उपलब्धता.<br>**इ)** प्रसाधनगृहाची साफसफाई/स्वच्छता. | ५ |
| ६ | **पिण्याच्या पाण्याची सुविधा** खालील बाबी आवश्यक असून, पुरावा जोडावा.<br>**अ)** संस्थेत स्वच्छ व सुरक्षित पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था ( पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, उपलब्ध सुविधा नळ, पाईप, बोअरवेल इ.) असणे आवश्यक ( पुरावा जोडावा )<br>**ब)** पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता. | ५ |
| ७ | **संगणक प्रयोगशाळा/संगणक कक्ष** खालील बाबी आवश्यक असून, पुरावा जोडावा.<br><br>**अ)** संस्थेमध्ये पुरेशा प्रमाणात संगणक असणे आवश्यक आहे. (पुरावा जोडावा)<br>**ब)** संगणक प्रयोगशाळेत बसण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे. (पुरावा जोडावा)<br>**क)** संगणक प्रयोगशाळेत इंटरनेट व्यवस्था असणे आवश्यक आहे. (पुरावा जोडावा)<br>**ड)** उच्च माध्यमिक साठी आवश्यक असलेले संगणक व इतर सुविधा असणारा संगणक कक्ष असावा. | ५ |
| ८ | **अ) जे.ई.ई./एन.ई.ई.टी. (NEET) साठी प्रशिक्षित व अनुभवी अध्यापक वर्ग असणे आवश्यक.**<br>**ब ) सन २०२२-२३, सन २०२३-२४ व २०२४-२५ या तीन शैक्षणिक वर्षात सदर संस्थेचे JEE/NEET या परिक्षांमध्ये उत्तीर्ण होऊन IIT/ NEET/AIMS यासारख्या वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेत प्रवेशीत झालेल्या विद्यार्थ्यांची वर्षनिहाय संख्या व यादी.**<br>(१ ते १० विद्यार्थी =५ गुण ११ ते २० विद्यार्थी =१० गुण २० ते ३० विद्यार्थी =१५ गुण)<br>**टिप-खाजगी प्रशिक्षक संस्थेसाठी क्रमांक २ मधील ५ गुण या १५ गुणांमध्ये (५+१५ = २०) याप्रमाणे समाविष्ठ रहातील.** | १५ |
| ९ | **संस्थेतील भौतिक, शैक्षणिक व इतर बाबींचे सोई-सुविधांबाबत P.P.T.** | १५ |
| १० | **प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येइतके प्रती विद्यार्थी शैक्षणिक सरावासाठी टॅब/लॅपटॉप/संगणकांची सुविधा उपलब्ध असलेबाबतची यादी (Inventory) सादर करणे.** | ५ |

Scanned with CamScanner

## व्यापारी (वित्तीय) लिफाफा (Financial Envelope)

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>वित्तीय बाबी</th><th>गुण</th></tr>
<tr><td>१</td><td>१. निविदेसोबत दिलेल्या BOQ File मध्ये दर भरणे निविदाधारकांना अनिवार्य आहे.<br>२. सदर BOQ File मध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करु नये. निविदाधारकाने दर भरत असतांना दरामध्ये सर्व करांचा (विक्रीकर, केंद्रीय उत्पादन शुल्क, आयकर, जी.एस.टी. इत्यादी सर्व शासकीय कर) आणि वाहतुक खर्चासह समावेश करुन दर भरणे आवश्यक आहे.<br>३. सदर दर BOQ File मध्ये भरुन ऑनलाईनरित्या अपलोड करणे निविदाधारकांना बंधनकारक आहे.<br>४. सादर करण्यात येणारा दर प्रती विद्यार्थी या दराने संभाव्य १०० विद्यार्थ्यांकरीता सादर करण्यात यावा. (निविदा अटी व शर्ती प्रमाणित केलेप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ आधारभूत मानुन दर सादर करावा.)</td><td>३०</td></tr>
<tr><td></td><td>

- **Evaluation for qualification**

Selection of Bidder will be as per Quality and Cost Based Selection (QCBS)method.

In order to allow comparision of financial proposal on a common basis, each financial proposal will be carefully scrutinized and total offer shall be determined. The lowest financial proposal (Fm) will be given a financial score (Sf) of 100 points. The financial score (Sf) of other financial proposal will be computed as under.

**Formula for determining the financial scores:**

The most preferred bidder (H-1 bidder ) for this formula shall be assessed as below ;

The lowest financial proposal (FM) will be given a financial score (SF) of 100 points. The financial scores of other proposals will be computed as follows :

SF=100 x FM / F

(SF=Financial Score,FM=offer of lowest bid,F=quoted offer)

Combined evaluation of Technical and Financial Proposals, Proposals will finally be ranked according to their combined technical (ST) and Financial (SF) scores using the weights indicated in the Data Sheet:

S = [{(STx70) /100}+{(SFx30)/100}]

Where,

S = Combined score,

ST = Technical Score out of 100

SF = Financial Score out of 100

Combined and final evaluation :

- The bidder will be ranked on their combined technical and financial score.
- This evaluation procedure reflects the high importance attached to quality and competence.
- The tender will be awarded to the bidder with the highest total marks

</td><td></td></tr>
</table>

**स्वाक्षरी**
सदस्य सचिव
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद,नाशिक

**स्वाक्षरी**
सदस्य
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक

**स्वाक्षरी**
सदस्य
अति.मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ,नाशिक

**स्वाक्षरी**
अध्यक्ष
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक

Scanned with CamScanner